# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-15.04.2026** **वार- बुधवार**

---

**आरोग्यसेवा**

शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र आणि गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आधार ठरत आहे. याअंतर्गत पुणे जिल्ह्यात गेल्या आर्थिक वर्षात ३,८६१ रुग्णांना सुमारे ३४ कोटी ५३ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्यानं पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरित्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

या योजनेअंतर्गत २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिलं जातं. गरजू रूग्णांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी आणि अधिक माहितीकरता १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असं आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केलं आहे.

**महसूलवाढ**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या प्रभावी कारवाईमुळे राज्याच्या महसुलात मोठी वाढ झाली आहे. गेल्या आर्थिक वर्षात पुणे विभागानं ३ हजार ६०५ कोटी रुपयांचा महसूल जमा करत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. त्याआधीच्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत महसूल संकलनात जवळपास १९ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली.

अवैध मद्यनिर्मिती, विक्री आणि तस्करीविरोधात राबवलेल्या मोहिमेत ६ हजारांहून अधिक गुन्हे दाखल करण्यात आले असून ७ हजार ४६४ जणांना अटक करण्यात आली आहे. परराज्यातील मद्य तस्करीविरोधात विशेष मोहीम राबवून ५० मोठे गुन्हे उघडकीस आणण्यात आले. या कारवाईत ७७ तस्करांना अटक करून कोट्यवधी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दरम्यान, पुणे उत्पादन शुल्क विभागानं प्रशासकीय कामकाजात सुधारणा करत 'ई-ऑफिस' प्रणालीद्वारे संपूर्ण कामकाज पेपरलेस केलं आहे.

**एआय प्रशिक्षण**

पुण्यातील लक्ष्मणराव आपटे प्रशालेत नुकताच आयबीएम कंपनीच्या आयबीएम सोअर- एआय टू बी अवेअर प्लस, या कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाचा, प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. यामध्ये इयत्ता सातवी ते नववीच्या दोनशे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धीमत्तेचं मूलभूत ज्ञान,भविष्यासाठी आवश्यक कौशल्यांसाठी सज्ज होण्यासाठी एआय चा वापर, तसंच डिजिटल जागरूकता यांचं सविस्तर मार्गदर्शन मिळालं. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार यशस्वी स्किल्स लिमिटेडच्या पुढाकारानं हा उपक्रम राबवण्यात आला.

**चर्चासत्र**

होमिओपॅथी उपचारपद्धती रुग्णाच्या संपूर्ण प्रकृतीचा विचार करून उपचार करणारी असून, योग्य वेळी निदान आणि नियमित उपचार केल्यास हृदयविकारावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते, असं मत होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. विद्यासागर उमाळकर यांनी व्यक्त केलं.

एस. एम. जोशी सभागृहात झालेल्या ‘हृदय रोग चर्चासत्र आणि मोफत मार्गदर्शन शिबीरात ते बोलत होते. हृदयविकारासंदर्भात जनजागृती करण्यासाठी श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, जय गणेश स्वच्छसेवा अभियान आणि चैतन्य होमिओ हार्ट केअर क्लिनिक अँड रिसर्च सेंटर यांनी या शिबिराचं आयोजन केलं होतं.

**रोजगारमेळावा**

पुणे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे येत्या २० एप्रिलपासून जिल्ह्यात विविध ठिकाणी पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. २० एप्रिल रोजी वरवंड इथल्या आयटीआय महाविद्यालयात तर २१ तारखेला इंदापूर, २२ तारखेला औंध, २३ तारखेला खेड आणि २७ तारखेला शिरुर इथल्या आयटीआय महाविद्यालयात रोजगार मेळावा होणार आहे. या मेळाव्यात नामांकित उद्योग सहभागी होणार असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त रोजगार इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा असं आवाहन संस्थेनं केलं आहे.

**हार्वर्ड केसस्टडी**

'ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' अशी ओळख असलेले उद्योजक भरत गीते यांची यशोगाथा अमेरिकेतील हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या केस स्टडीमधून मांडण्यात आली आहे. या माध्यमातून गीते यांच्या तौराल इंडिया या ॲल्युमिनियम सँड कास्टिंग क्षेत्रातील कंपनीनं जागतिक स्तरावर अभ्यासल्या जाणाऱ्या निवडक कंपन्यांच्या यादीत स्थान मिळवलं आहे.

कंपनीनं उच्च-प्रिसिजन ॲल्युमिनियम कास्टिंग व्यवसायाच्या प्रवासात ऊर्जा, रेल्वे, संरक्षण आणि एरोस्पेस यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांना सेवा देत, जागतिक स्तरावरील उत्पादन व्यासपीठापर्यंत केलेल्या प्रगतीचा यात समावेश आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल ४१ तर किमान १९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्या कमाल तापमानात बदल संभवत नाही मात्र किमान तापमानात वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**